CoverageReport: TCS IT Wiz – Nagpur Edition

**Publication:** Mahavidarbha
**Date:** 12/09/2014
**Edition:** Nagpur
**Page No:** 2
**Headline:**Nagpur edition of TCS IT WIZ 2014 on September 19

# टीसीएस आयटी विझ २०१४ ची नागपूर फेरी १९ सप्टेंबर रोजी

नागपूर : माहिती तंत्रज्ञान सेवा, सल्ला, व्यवसायांकरता आवश्यक सुविधा पुरविणारी आघाडीची कंपनी टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसेस अर्थात टीसीएसने टीसीएम आयटी विझ २०१४ च्या नागपूर फेरीची घोषणा केली आहे. १९ सप्टेंबर शुक्रवार रोजी टीसीएस आयटी विझ नागपुरातील सिव्हील लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे हॉल, एमएलए हॉस्टेयच्या समोर येथे पार पडेल. इयत्ता आठवी ते बारावीपर्यंत विद्यार्थी टीसीएस आयटी विझमध्ये सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेसाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेशशुल्क भरण्याची आवश्यकता नाही. टीसीएस आयटी विझमध्ये सहभागी होण्यास इच्छुक असलेली कोणतीही शालेय संस्था एकापेक्षा अधिक संघ पाठवू शकते. एका संघामध्ये फक्त दोनच स्पर्धक असू शकतात. यंदाच्या वर्षी टीसीएस आयटी विझच्या विभागीय फेऱ्या अहमदाबाद, बँगलोर, भुवनेश्वर, चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली हैद्राबाद, इंदौर, कोची, कोलकाता, लखनौ, मुंबई, नागपूर व पुणे या चौदा शहरांमध्ये घेतल्या जाणार आहेत. इच्छुक शालेय संस्थानी आपआपल्या प्रवेशिका १७ सप्टेंबर या दिवशी किंवा त्यापूर्वी श्री. प्रशांत कोपरकर, टीसीएस आयटी विझ कोऑर्डीनेटर यांचेकडे टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसेस, मा रेणुका भवन, हर्षल नर्सिंग होम, इंदोरा स्के अर, नागपूर ४४००१७ या पत्त्यावर पाठवाव्यात.